Peer Reviewed Journal

ISSN 2319-8648

Impact Factor (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

International Peer Reviewed Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Special Issue 20 Vol. I

on

## भारतीय समाज और विकलांग (दिव्यांग) विमर्श

## Indian Society & Ideology of Disability

October 2019

Associate Editor
Dr. Shivaji Wadchkar

Guest Editor
Principal Dr. V.D. Satpute

Assistant Editor
Dr. V.B. Kulkarni
Dr. A.K. Jadhav
Dr. S.A. Tengse

www.publishjournal.co.in

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue XX , Vol. I | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Octomber 2019 | SJIF | Impact Factor : 7.139

# Index


| | | |
|---|---|---|
| 1. | अपंगत्व (दिव्यांग) : प्रतिबंधात्मक उपाय, उपचार आणि पुनर्वसनाचे साधने<br>प्रा. डॉ. विलास घोडे | १ |
| 2. | अपंग व्यक्तींच्या सक्षमीकरणात प्रशासनाची भूमिका<br>प्रा.डॉ.सोमवंशी मुक्ता (गंगणे) | १८ |
| 3. | अपंगत्वः स्वरूप,प्रकार व यशस्वी व्यक्ती<br>प्रा. सखाराम बाबाराव कदम | 23 |
| 4. | मराठीतील अपंग साहित्य प्रवाह : अभिसरण आणि मूल्यभान<br>प्रा.अरविंद रा.जाधव | 26 |
| 5. | दिव्यांग व्यक्तीचे प्रकार : एक अभ्यास<br>प्रा. नवनाथ बंकट बडे, | 32 |
| 6. | विकलांग व्यक्तिंचे मराठी कादंबरीतून आलेले चित्रण<br>प्रा. देशमुख बिभीषण | 36 |
| 7. | अपंग व्यक्तींचे प्रकार आणि अपंगत्वाचे व्यवरथापन<br>प्रा. डॉ. जाधव अशोक काकासाहेब | ४२ |
| 8. | दिव्यांगाचे पुनर्वसन एक सामाजिक आव्हान<br>प्रा. गंगाधर चव्हाण | ४६ |
| 9. | मानसिक विकलांगता<br>डॉ. घोडके अरविंद अंबादास | ४९ |
| 10. | दिव्यांग स्त्रियांची समाजिक स्थिती<br>प्रा.ज्ञानेश्वर किसान म्हात्रे | 51 |
| 11. | भारतीय समाजातील अपंगाची स्थिती<br>डॉ.सुनिता आत्माराम टेंगसे | 57 |
| 12. | दिव्यांगासाठी शासनाच्या योजना<br>प्रा. डॉ. एम.डी.कच्छवे | ६१ |
| 13. | दिव्यांगासाठी शासनाच्या विविध कल्याणकारी योजना<br>प्रा. डॉ. रविंद्र विठोबा विखार | 65 |
| 14. | यशस्वी अपंगत्व<br>प्रा. डॉ.अंबादास पांडुरंग बर्वे | 70 |

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta. Sonpeth Dist. Parbhani

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue XX , Vol. I | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Octomber 2019 | SJIF | Impact Factor : 7.139

# अपंग व्यक्तींच्या सक्षमीकरणात प्रशासनाची भूमिका

**प्रा.डॉ.सोमवंशी मुक्ता (गंगणे)**

के.रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ जि.परभणी

---

समाजामध्ये काही व्यक्तीना जन्मजात तर काही व्यक्तीना अपघातामुळे आलेल्या अपंगत्वाचा स्वीकार करावा लागतो. भारतीय समाजामध्ये सुमारे 2.68 कोटी लोक अपंग असल्याचे 2011 च्या जनगणनेनुसार दिसून येते. या 2.68 कोटी लोकांचा शासनाला विचार करणे क्रमप्राप्त ठरते. तेंव्हा भारत सरकारने व महाराष्ट्र सरकारने समाजातील दृष्टीहीन, कर्णबधीर, अस्थिव्यंग, मनोविकलांग व कुष्ठरोग मुक्त व्यक्तीकडे त्यांच्या अपंगत्वाकडे न पाहता त्यांच्यामध्ये असलेल्या सामर्थ्यांकडे पाहून त्यांच्यामधील असलेले सुप्त गुण विकसित करून त्यांना समाजात सर्व क्षेत्रात समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी त्यांचा शासनातील सहभाग व त्यांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे या दृष्टीने समाजिक न्याय व इतर विभागामार्फत कल्याणकारी योजना राबविल्या जात आहेत. त्याचबरोबर सामाजिक सुरक्षिततेसाठी अपंगाना काही क्षेत्रामध्ये आरक्षण सवलती, सुट व प्राधान्य देण्यात आलेले आहे. या सर्वांचा उद्देश अपंग व्यक्तींना सक्षम बनवून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील करणे हा आहे. तेंव्हा शासनाच्या अपंग धोरणांची योग्य अमंलबजावणी करून त्यांना योग्य न्याय देण्याची भूमिका प्रशासकीय यंत्रणा पार पाडते. यासाठी आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, समाजकल्याण विभागाद्वारे अपंग व्यक्तीसाठीच्या धोरणांची पूर्तता केली जाते. शासनाच्या या योजना अपंग व्यक्तींना मिळाव्यात त्यांचे जीवन समृध्द व्हावे यासाठी प्रशासन यंत्रणा कार्यरत असते.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोध निबंध लिहीण्यासाठी दुय्यम साधन सामग्रीचा वापर करण्यात आला असून त्यामध्ये संदर्भ ग्रंथ, शासकीय पत्रक, मासिक, वर्तमान पत्र व इंटरनेटचा समावेश आहे.

शोधा निबंधाचा उद्देश :-

1. अपंग व्यक्तीसाठीच्या विविध शासकीय योजनांचा आढावा घेणे.
2. शासकीय योजनांच्या अमंलबजावणीत प्रशासनाची भूमिका स्पष्ट करणे.

**गृहितकृत्य :-**

अपंग व्यक्तीसाठी राबविण्यात आलेल्या योजनामुळे अपंग व्यक्तीच्या विकासाला मदत झाली आहे.

**अपंगत्वाचा अर्थ :-**

अपंग व्यक्ती कोणास म्हटले जाते. याचा विचार केला असता ज्या व्यक्ती शारिरीक किंवा मानसिक दृष्ट्या दुर्बल असतात त्यांना अपंग असे म्हटले जाते. `सामान्यत: अपंग व्यक्तीच्या शरीराचा एखादा अवयव किंवा काही अवयव अंशत: किंवा पूर्णत: निकामी झालेले असतात. काही व्यक्ती मानिकसदृष्ट्या विकलांग असतात. म्हणजे अशा व्यक्तींच्या मेंदूचे कार्य योग्य प्रकारे किंवा पुरेशा कार्यक्षमतेने चालत नाही. त्यामुळे त्यांना इतर सर्वसामान्य माणसा प्रमाणे वागणे शक्य होत

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta Sonpeth Dist. Parbhani

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue XX , Vol. I<br>Octomber 2019 | Peer Reviewed<br>SJIF | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

या कायद्यानुसार अपंग व्यक्तीसाठी शिक्षण, नोकरी किंवा रोजगार, व्यवसायिक प्रशिक्षण, अनुकूल सुविधांची निर्मिती यासंबंधीच्या संधी उपलब्ध करून देण्यासंबंधी तरतुदी करण्यात आल्या. शासकीय नोकऱ्यांमध्ये अपंगासाठी 3% पेक्षा कमी आरक्षण असता कामा नये अशी तरतूद करण्यात आली आहे.

**आर्थिक विकास :-** अपंग व्यक्तीचा आर्थिक विकास करण्याच्या उद्देशाने शासनाने स्वतंत्र अशा मंडळाची निर्मिती केली आहे.

1. **राष्ट्रीय अपंग आर्थिक विकास महामंडळ :-** ही संस्था अपंग व्यक्तींना त्यांच्या आर्थिक विकासासाठी वित्तीय पुरवठा करणारी सर्वोच्च संस्था आहे. राज्यशासन, केंद्रशासित प्रदेश आणि बिगर शासकीय संस्थाच्या माध्यमातून वित्तीय सहाय्य व वितरण केले जाते. पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणासाठी कर्जपुरवठा केला जातो. अपंग व्यक्तींकडील तांत्रित आणि व्यवसायिक कौशल्य विकसित करण्यासाठी वित्तीय सहाय्य करणे व त्यांची उत्पादन क्षमता वाढविण्याचे कार्य ही संस्था करते या महामंडळाचे कार्यालय फरिदाबाद येथे आहे.
2. **सहाय्य योजना :-** अपंगाना अपंगत्वावर मात करून त्यांच्या शारिरीक सामाजिक आणि मानसिक पुनर्वसनाद्वारे आर्थिक क्षमता वाढविण्यासाठी सहाय्य करण्यासाठी ही योजना सहाय्य करते.
3. **महाराष्ट्र राज्य अपंग वित्त आणि विकास महामंडळ :-** अपंग व्यक्तींना रोजगार किंवा स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यासाठी नोव्हेंबर 2001 मध्ये स्वतंत्र महाराष्ट्र राज्य अपंग वित्त आणि विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. या महामंडळाकडून 2009-10 या वर्षासाठी अपंगाच्या कल्याणासाठी 30,400 लाख एवढ्या निधीची तरतुद करण्यात आली.
4. **केंद्रशासन पुरस्कृत अपंग एकात्म शिक्षण योजना :-** अपंग मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे हा या योजनेचा उद्देश आहे. 1992 नंतर या योजनेचा विस्तार संपूर्ण राज्यात करण्यात आला.
5. **स्वयंसेवी संस्थांना प्रोत्साहन :-** अपंग व्यक्तीसाठी कार्य करणाऱ्या संस्थांना केंद्रशासनामार्फत आर्थिक सहाय्य देण्यात येते.
6. **राष्ट्रीय विश्वस्त कायदा 1999 :-** मेंदूचा पक्षघात, मतिमंद, आत्ममग्न तेसच बहूविलांग व्यक्तींसाठी राष्ट्रीय पातळीवर एका न्यासाची स्थापना करण्यात आली. या न्यासातर्फे मतिमंदाचे मालकत्व, केअर सेंटर्स इत्यादी योजना राबविण्यात येतात. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अध्यक्षतेखाली स्थापित करण्यात आलेल्या समितीमार्फत न्यासाचे कार्य चालते.
7. **राष्ट्रीय अपंग पुरस्कार :-** अपंग व्यक्ती त्यांच्यासाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती, अधिकारी, संस्था, जिल्हे यांना हा पुरस्कार दिला जातो.

**महाराष्ट्र शासनाचे कार्यक्रम व योजना**

1. **आरोग्य :-** शासनामार्फत अपंग प्रतिबंधक कार्यक्रम, सर्वेक्षण, शालेय आरोग्य, तपासणी, जनजागृती, माता-बाल संगोपण कार्यक्रम, वैद्यकिय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण असे विविध कार्यक्रम राबविले जातात.

Special Issue XX , Vol. I | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Octomber 2019 | SJIF | Impact Factor : 7.139


Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani


2. **शिक्षण :-** अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, त्यांच्यासाठी विशेष शाळामार्फत शिक्षणाची व्यवस्था, सर्वसमावेशक शिक्षण, शिक्षणशास्त्र अध्यापक पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेशामध्ये 3% आरक्षण, वैद्यकिय अभ्यासक्रमासाठी 2 ते 5% जागा राखीव, शासकीय वस्तीगृहामध्ये अपंग विद्यार्थ्यांना 3% राखीव जागा, माध्यमिक उच्च माध्यमिक परिक्षांमध्ये सवलती व सुविधा वगैरे उपक्रम योजना राबविल्या जातात.

3. **प्रशिक्षण :-** औद्योगिक तंत्र प्रशिक्षण संस्थामध्ये अपंगांना प्रवेशासाठी 3% आरक्षण दिले जाते. तसेच सामाजिक न्याय विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या अपंगाच्या कार्यशाळेमधुन अपंगांना निवास व अनिवासी व्यवसाय प्रशिक्षण दिले जाते.

4. **रोजगार व स्वयंम रोजगार :-** शासकीय व निमशासकीय सरळ सेवा भरतीमध्ये अपंगांना 3 टक्के आरक्षण, त्यांच्यासाठी विशेष सेवायोजना कार्यालय, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त विकास महामंडळ, स्वयं रोजगारासाठी बीज भांडवल, व्यवसायासाठी अर्थसहाय्य अशा विविध प्रकारच्या शासकीय योजना व उपक्रम अपंग व्यक्तींसाठी राष्ट्रीय तसेच राज्य पातळीवरून राबविण्यात येतात. यासर्व योजना अपंग व्यक्तींना मिळाव्यात त्यांना सामाजिक व आर्थिक सुरक्षितता मिळावी यासाठी प्रशासन सतत कार्यरत असते. अपंग व्यक्तींना विशेष सेवा प्रदान करण्यात येतात. भारतामध्ये अपंग व्यक्तींसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा फायदा घेऊन अनेक अपंग व्यक्तींनी आपला विकास घडवुन आणला आहे. एवढेच नव्हे तर प्रशासनातील महत्वाच्या पदावर अनेक अपंग व्यक्ती कार्यरत आहेत. भारतातील IAS परीक्षेमध्ये पास होऊन देशातील पहिल्या अंध महिला कलेक्टर होण्याचा मान महाराष्ट्रातील `प्रांजली पाटील` यांनी मिळवला असुन त्या आपली जबाबदारी समर्थपणे पार पाडीत आहेत. त्यांचा जिल्हाधिकारी पदापर्यंतचा प्रवास पाहून सामान्य माणूसही आश्चर्यचकित होतो. अपंग व्यक्तीमध्ये काही विशेष गुण असतात असे म्हटले जाते. या गुणांचा राष्ट्राच्या विकासासाठी उपयोग करून घेण्यासाठी त्यांना विशेष सवलती देवुन त्यांच्या सुप्त गुणांचा विकास घडवुन आणण्याची जाबाबदारी प्रशासनाची असते.

अपंग व्यक्तींच्या कल्याणासाठी सरकारने केलेली आणखी एक उपाययोजना म्हणजे त्यांच्यासाठी राष्ट्रीय संस्थांची निर्मिती होय. अपंग व्यक्तींच्या विविध समस्या परिणामकारक रीतीने हाताळता याव्यात याकरीता या संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. त्यापैकी महत्वाच्या संस्था

1. राष्ट्रीय दृष्टिहीन संस्था, डेहराडून
2. राष्ट्रीय अस्थीरोग विकलांग संस्था, कोलकत्ता
3. अली यावर जंग राष्ट्रीय बधिर संस्था, मुंबई
4. राष्ट्रीय मानसिक विलांग संस्था, सिकंदराबाद
5. राष्ट्रीय पुनवर्सन प्रशिक्षण व संशोधन संस्था, कटक
6. शारीरिक विकलांग संस्था, नवी दिल्ली
7. राष्ट्रीय बहूविकलांग व्यक्ती सबलीकरण संस्था, चेन्नई.

उपरोक्त विविध संस्थांच्या माध्यमातून अपंग व्यक्तींना समाजात सुरक्षितता प्रदान करण्याचा प्रयत्न केला जातो. त्याच बरोबर एक व्यक्ती म्हणुन त्यांनाही आपला विकास करण्यासाठी सर्व संधी उपलब्ध करून दिल्या जातात. प्रशासनाकडुन त्यांच्या या सर्व योजनांची अमंलबजावणी केली जाते. अपंग व्यक्तींना न्याय मिळवुन देण्याचा प्रयत्न केला जातो. आज

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue XX , Vol. I | Octomber 2019 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 | Impact Factor : 7.139

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

बहुतांश अपंग व्यक्तींना त्यांचे जीवन योग्य पध्दतीने जगण्यायोगय परिस्थिती निर्माण करून देण्यात आली आहे. प्रशासनातील व्यकतींनी अपंग व्यक्तींसाठी कार्य करीत असतांना आपली जबाबदारी अधिक प्रभावीपणे पार पाडणे आवश्यक आहे. अपंग व्यक्तींच्या योजना राबवित असतांना त्यांना कोणतेही अडथळे येता कामा नयेत. कारण अगोदरच शारीरिकदृष्ट्या कमजोर असलेल्या व्यक्तींना या योजनांचा लाभ मिळून घेण्यासाठी प्रशासनातील काही दोषांचा बळी जाण्याची परिस्थिती निर्माण होऊ नये. त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टी चांगला असावा. त्यांच्या प्रती दया व सहानुभुती असावी. त्यांच्या कार्यांना प्राधान्य देवुन ती वेळेत पुर्ण व्हावीत अशी प्रशासनाची भूमिका असावी.

**सारांश व निष्कर्ष :-** प्रस्तुत शोधनिबंधासाठी निश्चित करण्यात आलेले गृहितकृत्य सिध्द होते. केंद्र शासन व राज्य शासनाच्या अपंग व्यक्तींसाठीच्या उपक्रमांचा लाभ अनेक अपंगांना मिळालेला आहे. अनेक अपंग व्यक्ती शासकीय सेवेत कार्यरत आहे. तसेच अपंग व्यक्तींना आवश्यक असणाऱ्या वस्तुंचा पुरवठा केला जातो. त्यांना कृत्रीम अवयव बसविण्यासाठी आर्थिक मदत आरोग्य सेवा मोफत दिल्या जातात. देशातील एकुण अपंग व्यक्तींपैकी 49 टक्के साक्षर आहेत. तर 34 टक्के लोकांकडे रोजगार आहे. असे असले तरी या देशातील ग्रामीण भागातील अनेक लोकांना शासकीय योजनांची माहिती नसते. माहिती मिळाली तरी तया योजनेचा लाभ कसा मिळतो याचे ज्ञान नसते. यामुळे अनेक व्यक्तींना या योजनांचा लाभ मिळत नाही. तेंव्हा प्रशासनाने अशा व्यक्तीसाठी एखादा विशेष उपक्रम राबवुन त्यांना सहकार्य करणे गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :-**

1) महाराष्ट्र वार्षिकी 2012 - संपादक तुकाराम जाधव, युनिक 4, युनिक अॅकॅडमी पुणे ङ 2012
2) प्रा.व्ही.बी.पाटील - मानवी हक्क, के सागर पब्लिकेशन्स पुणे 2012
3) डॉ.प्रतिभा पाटील व प्रा.अंबादास आरगडे - सामाजिक आणि आर्थिक प्रशासन आदित्य प्रकाशन लातूर 2012
4) डॉ.त्र्यंबक दुनबळे, जन माध्यम प्रसारण अधिकारी, अली यावरं जंग राष्ट्रीय श्रवण विकलांग संस्थान, मुंबई

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani